स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानवविज्ञान शाखेअंतर्गत 'इतिहास' विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"हिंदवी स्वराज्य उभारणीतील निवडक उपेक्षित मावळ्यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास" (इ.स. १६३० ते १७०७)

संशोधक

देविदास बालाजीराव मोरे

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, ता.बिलोली, जि. नांदेड

मार्गदर्शक

डॉ.किशन केंद्रे

सहयोगी प्राध्यापक तथा इतिहास विभाग प्रमुख,
लोकमान्य महाविद्यालय सोनखेड, ता.लोहा, जि. नांदेड

संशोधन केंद्र

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, ता. बिलोली, जि.नांदेड

डिसेंबर २०२४

“हिंदवी स्वराज्य उभारणीतील निवडक उपेक्षित मावळ्यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मराठा साम्राज्याचा इतिहास अर्थात मराठ्यांच्या इतिहासाला महत्वाचे स्थान आहे.इ.स. १६३० ते इ.स. १८१८ हा मराठा साम्राज्याचा कालखंड आहे. मराठा राज्याचे म्हणजेच मराठ्यांच्या इतिहासाचे विभाजन दोन कालखंडात करण्यात येते पहिला कालखंड इ.स. १६३० ते १६८० असा असून हा कालखंड मराठ्यांच्या इतिहासात शिवकाळ अर्थातच छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड या नावाने ओळखला जातो. छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते.त्यांनी स्थापन केलेल्या स्वराज्यात सर्व जाती जमातीचे लोक गुण्यागोविंदाने नांदत होते.त्यांचे राज्य बहुतजणांशी आधारू असे सामान्य लोकांचे राज्य होते.या दृष्टीने मराठ्यांच्या इतिहासात शिवकाळ महत्त्वाचा ठरतो.छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले आणि खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य आले.या स्वराज्य स्थापनेच्या महत् कार्यास छत्रपतींना आपल्या मावळ्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. इ.स. १६४५ रायरेश्वराच्या साक्षीने छत्रपतींनी आपल्या सवंगड्यासोबत स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली तेव्हापासून या सवंगड्यांनी म्हणजेच मावळ्यांनी त्यांना स्वराज्य निर्मितीच्या कार्यात मोलाची साथ दिली वेळ प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती दिली.

स्वराज्य निर्मिती ही संघटित अशा असंख्य प्रयत्नांचा परिपाक होय. या कार्यात छत्रपती शिवाजी महाराजांना साथ देणाऱ्या अनेक मावळ्यांच्या यशोगाथा आपल्या ज्ञात आहे. परंतु आजही असे अनेक शूरवीर मावळे ज्यांनी या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात अथक परिश्रम घेतले. वेळ प्रसंगी

रक्त सांडले आपल्या प्राणांची आहुती दिली अशा मावळ्यांच्या कार्याची फारशी नोंद इतिहासात नाही, या उपेक्षित राहिलेल्या

अपरिचित मावळ्यांचा त्यांच्या कार्याचा आढावा या संशोधनातून घेतला जाणार आहे.

विषय निवडीचा उद्देश

शेकडो वर्षापासून गुलामगिरीत खितपत पडलेल्या महाराष्ट्रातील जनतेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने एक तारणहार मिळाला.कारण शिवपूर्वकालीन महाराष्ट्रात परकियांच्या हाती सत्ता असल्यामुळे रयतेवरील अन्याय अत्याचारांनी जनतात्रस्त होती.अशा या जुलमी अन्यायी परकीय सत्तेविरुद्ध शिवरायांनी लढा उभा केला.तो लढा म्हणजे स्वराज्य निर्मितीचा लढा रयतेच्या राज्याचा लढा.या लढ्यात त्यांना सावली प्रमाणे साथ मिळाली, ती त्यांच्या मावळ्यांची.मावळ्यांनी आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली, वेळ प्रसंगी प्राणांची आहुती दिली. यामध्ये तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, कोंडाजी फर्जद, येसाजी कंक, प्रतापराव गुजर, जिवाजी महाले, शिवा काशिद, फिरगोंजीनरसाळा, हंबीरराव मोहिते अशी अनेक नावे आपल्या डोळ्यासमोर येतील. त्यांचे कार्य, त्यांचा पराक्रम, त्यांची या स्वराज्य उभारणीतील कामगिरी आपणास इतिहासाच्या विविध लिखित साधनांमधून मिळते. परंतु या स्वातंत्र्य संग्रामात त्यांच्याच खांद्याला खांदा लावून लढलेल्या मावळ्यांचे योगदान ही तितकेच महत्त्वाचे होते.अशा मावळ्यांचे कार्य त्यांच्या बाबतीतील इत्यंभूत माहिती उपलब्ध नाही.अशा उपेक्षित किंवा दुर्लक्षित वा अपरिचित मावळ्यांचे योगदान त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत विषयांची निवड केली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व

हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत छत्रपती शिवाजी महाराजांसोबत अनेक मावळ्यांनी आपले बहुमूल्य असे योगदान दिले त्यांचे कार्य कर्तृत्व

त्यांचा पराक्रम सर्वश्रुत आहे. परंतु यापैकी बऱ्याच मावळ्यांचे मोलाचे सहकार्य या कार्यात लाभले यामध्ये बहलोल खाना विरुद्धच्या लढाईतील सिधोजी निंबाळकर, रुपाजी भोसले असतील किंवा 'वेडात वीर दौडले सात' यामधील प्रतापराव गुर्जर यांच्यासोबत

असणारे विसाजी बल्लाळ, दिपोजी राऊतराव, विठ्ठल पिलाजी अत्रे, कृष्णाजी भास्कर, सिद्धीहिलाल, विठोजी असतील वा पावनखिंडीच्या लढाईतील बाजीप्रभू देशपांडे यांच्या सोबत लढणारे फुलाजी, रायाजी हे बांदलांचे शिलेदार असतील. असे अनेक मावळे त्यांनी स्वराज्याच्या निर्मितीमध्ये आपले बहुमोल असे योगदान दिले त्यांचे योगदान त्यांचे कर्तृत्व त्यांचा पराक्रम हा काहीसा दुर्लक्षित राहिला अशा मावळ्यांचा कार्य कर्तृत्वाचा आढावा या संशोधन कर्यातून घेतला जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधनाची व्याप्ती म्हणजे संशोधन विषयाचे अभ्यास क्षेत्र होय. या संशोधन कार्यात शिवछत्रपतींच्या स्वराज्य उभारणीच्या कार्यात अफाट पराक्रम गाजवणाऱ्या अथक परिश्रम घेणाऱ्या शत्रूंशी निकराने लढणाऱ्या मावळ्यांच्या शौर्याचा त्यांच्या कार्याचा आढावा घेतला जाणार आहे. स्वराज्य निर्मितीच्या या महान कार्यात छत्रपतीसोबत असणारे अनेक मावळे व त्यांचे कार्य आपल्या परिचयाचे आहे परंतु या कार्यात सहभागी असणारे अद्यापपर्यंत उपेक्षित वा दुर्लक्षित राहिलेले मावळे त्यांचे कार्य त्यांनी गाजवलेला पराक्रम या सर्वांचा आढावा या संशोधन कार्यातून घेतला जाणार आहे.

संशोधन विषयाची आवश्यकता

छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.त्यांच्या या स्वराज्य निर्मितीच्या महान कार्यामध्ये त्यांना मोलाची साथ मिळाली ती मावळ्यांची. येसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, बहिर्जी

नाईक, प्रतापराव गुजर अशा अनेक पराक्रमी मावळ्यांची नावे आपल्या डोळ्यासमोर येतील. त्यांची इतिहसात नोंद आपल्याला मिळेल परंतु कित्येक मावळे अजूनही दुर्लक्षित आहेत. त्यांची व त्यांच्या कार्याची नोंद आपल्याला इतिहासात आढळत नाही अशा

मावळ्यांचा इतिहास समोर येणे आवश्यक आहे त्यामुळे या उपेक्षित राहिलेल्या मावळ्यांच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्यासाठी या विषयावर संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

संशोधन पद्धती

इतिहास विषयक लेखनाचे संशोधन करत असताना वेगवेगळ्या संशोधन पद्धतींचा वापर केला जातो. त्यामध्ये मुख्यत: वर्णनात्मक पद्धत, वस्तुनिष्ठवादी संशोधन, सर्वेक्षणात्मक संशोधन, मार्क्सवादी संशोधन इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होतो. समकालीन इतिहास विषयक संशोधन करत असताना विश्लेषणात्मक, सर्वेक्षणात्मक व वर्णनात्मक या संशोधन पद्धतीचा वापर केला जातो. कोणत्याही विषयावर संशोधन करत असताना योग्य संशोधन पद्धतीचा अवलंब करणे अत्यंत महत्वाचे असते कारण योग्य संशोधन पद्धतीमुळेच संशोधनाच्या कार्यासशास्त्रीय स्वरूप प्राप्त होते. संशोधन कार्यात चुकीच्या संशोधन पद्धतीचा वापर केल्यास संशोधनाची उद्दिष्टे व गृहितके ही अपूर्ण राहून संशोधन अयशस्वी होते.म्हणून अचूक व परिणामकारक अशा संशोधन पद्धतीचा अवलंब महत्त्वाचा आहे. त्यामुळे मी माझ्या "हिंदवी स्वराज्य उभारणीतील निवडक उपेक्षित मावळ्यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास" (इ.स. १६३० ते १७०७) या संशोधन कार्यासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा अवलंब करणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1. छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेचा उद्देश जाणून घेणे.
2. स्वराज्य म्हणजे रयतेचे राज्य या संकल्पनेची माहिती घेणे.
3. स्वराज्य निर्मितीत मावळ्यांचे योगदान याचा आढावा घेणे.

4. मावळ्यांची पार्श्वभूमी, जबाबदारी आणि कार्य यांचा आढावा घेणे.

5. अद्याप पर्यंत उपेक्षित राहिलेल्या मावळ्यांच्या जीवनाचा आढावा घेणे.

6. अशा उपेक्षित दुर्लक्षित राहिलेल्या मावळ्यांचा व त्यांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करणे.

7. स्वराज्य उभारण्यात या मावळ्यांचे व त्यांच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करणे.

8. अद्यापपर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या मावळ्यांच्या कामगिरीवर प्रकाश टाकणे.

प्रकरण योजना

संशोधन विषयाची मांडणी एकूण पाच प्रकरणात केलेली असून प्रकरण निहाय रूपरेषा पुढीलप्रमाणे

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रबंधातील 'प्रस्तावना' हे प्रबंधातील पहिले प्रकरण आहे. या प्रकरणातसंशोधन विषयाची प्रस्तावना, विषयाची निवड त्याचे महत्त्व, पूर्वाभ्यास आणि संशेधनाची आवश्यकता, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची पद्धती, संदर्भ साधने तसेच छत्रपती शिवाजी

महाराज यांची स्वराज्य निर्मितीची संकल्पना उद्देश्य, वयातील मावळ्यांचे योगदान या विषयी माहिती दिली आहे.

प्रकरण दुसरे : स्वराज्याची पायाभरणी

'स्वराज्याची पायाभरणी' हे या प्रबंधातील दुसरे प्रकरण असून यामध्ये शतकानुशतके अन्यायी राजवटीच्या छायेत खितपत पडलेल्या गुलामगिरीच्या चक्रव्युहात अडकलेल्या रयतेला स्वातंत्र्याच स्वप्न बघणं ही दुरापस्त होत अशा वेळेस स्वातंत्र्याच स्वप्न बघणं आणि ते प्रत्यक्षात साकार करण यासाठी छत्रपती शिवाजी महाराज आणी त्यांच्या सावंगडयानी केलेली प्रयत्नांची सुरुवात म्हणजेच स्वराज्याची पायाभरणी होय या प्रकरणात त्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : स्वराज्य स्थापनेतील मावळ्यांचे योगदान (इ.स. 1630-1680)

'स्वराज्य स्थापनेतील मावळ्याचे योगदान' हे प्रबंधातील तिसरे प्रकरण असून, प्रस्तुत प्रकरण स्वराज्याच्या उभारणी मध्ये शिवरायांना मोलाची साथ देणाऱ्या मावळ्यांच्या योगदानाविषयी आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : उपेक्षित मावळ्यांचे स्वराज्य स्थापनेतील योगदान (इ.स.1681-1707)

'उपेक्षित मावळ्यांचे स्वराज्य स्थापनेतील योगदान' हे या प्रबंधातील चौथे प्रकरण असून या प्रकरणात स्वराज्याच्या जडणघडणीतील महत्त्वाचा भाग असणाऱ्या परंतु अद्यापपर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या मावळ्यांच्या कार्याचा अभ्यास करून त्यांच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : उपसंहार

'उपसंहार' हे या प्रबंधातील पाचवे आणि शेवटचे प्रकरण असून, या प्रकरणात संशोधनाचा निष्कर्ष दिला जाईल.

संदर्भसूची

1. कुलकर्णी डॉ.अ.रा., 'शिवकालीन महाराष्ट्र', राजहंस प्रकाशन, पुणे, 1997.
2. राजवाडे वि.का., 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड 17', पुणे.
3. देशपांडे डॉ.प्र.न., 'छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे', धुळे, सुषमा प्रकाशन, 1983.
4. कृष्णाजी अनंत सभासदकृत 'श्री छत्रपतींचे चरित्र', पुणे, प्रतिमा प्रकाशन, 201.
5. कुलकर्णी डॉ.अ.रा., देशपांडे डॉ.प्र.न., 'मराठ्यांचा इतिहास', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, 1995.
6. पवार डॉ.जयसिंगराव, 'छत्रपतींची स्वराज्याची संकल्पना', मेहता प्रकाशन, 2022,
7. पवार डॉ.जयसिंगराव, 'मराठा सत्तेचा उदय', प्रशांत प्रकाशन, 2015

12. बेंद्रे वा.सी., ‘मालोजीराजे आणि शहाजी महाराज’, मराठी देशा प्रतिष्ठाण प्रकाशन, 2022.

13. बेंद्रे वा.सी., ‘विजापूरची आदिलशाही’, मराठी देशा प्रतिष्ठाण प्रकाशन, 1968.

14. वर्तमानपत्रावरील लेख

संशोधक

देविदास बालाजीराव मोरे

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, ता.बिलोली, जि. नांदेड

मार्गदर्शक

Dr. Kishan Kendre

Asso. Professor, Head &

सहयोगी प्राध्यापक तथा इतिहास विभाग

Research Supervisor

Dept. of History

Lokmanya Mahavidyalaya, Sonkhed

Tq. Loha Dist. Nanded